Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 5 | January – 2017

# "शिवकालीन ग्रामदेवता एक चिकित्सक अध्ययन"

**प्रा. डॉ. व्ही.जी. वसु**
**इतिहास विभाग प्रमुख,डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय,पातूर, जि. अकोला.**



**प्रस्तावना:**

अतिप्राचीन काळी मानवाचा निसर्गशक्तीशी सर्वकष संघर्ष सुरू झाला. निसर्गशक्तींना प्रसन्न करून घेण्यासाठी प्राचीन मानवाने दोन प्रकारच्या पध्दतीचा पुरस्कार केलेला दिसून येतो. पहिल्या पध्दतीमध्ये जादूटोण्याचा उपयोग करून निसर्गशक्तीना कहयात आणण्याचा प्रयत्न दिसून येतो, तर दुसऱ्या पध्दतीमध्ये निसर्गघटकांचा अनुनय करून त्यांना प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. थोडयाफार वैज्ञानिक प्रगतीबरोबर पहिली पध्दती निष्प्रभ झाली. दुसरी पध्दती मात्र कालमानाप्रमाणे अधिक प्रभावी ठरली. त्यातूनच विविध देवतांचा उदय झाला. प्राग - ऐतिहासिक काळापासूनच देवतामालक धार्मिक कल्पनांचा प्रभाव जगातील वेगवेगळया ठिकाणी भटकणाऱ्या मानवसमूहावर असलेला दिसून येतो. शेतीचा शोध हा मानवी जीवनातील सर्वात क्रांतिकारक शोध मानला जातो. शेतीमुळे मानवाचे भटके जीवन स्थिर झाले; त्याचबरोबर पृथ्वीच्या ठिकाणी असलेल्या 'सुजलां सुफलाम्' या गुणांची ओळख मानवाला झाली. तेव्हापासून मातृदेवतेच्या पूजेचे माहात्म्य वाढले. निसर्गाचे घटक म्हणून सूर्य, पर्जन्य, वायू, आकाश यांना देवस्वरूप समजले जावू लागले. तर पृथ्वीदेवतेवर असलेल्या नि:सीम भक्तीतून डोंगर, नद्या, वृक्ष-लता आणि सर्पासारखे प्राणी यांनाही मानवाने देवस्वरूप बनविले. फार काय, स्त्रीच्या ठिकाणी बीजधारणेचा आणि प्रसूतीचा गुण असल्यामुळे तिलाही देवता मानले जावू लागले. पशूपालनाचा व्यवसाय असणाऱ्या मानवसमूहांनी आपापल्या पाळीव पशूंना देवता मानण्यास सुरूवात केली, मानवी जीवन स्थिर झाल्यानंतर मृत व्यक्तीविषयी आदर दर्शविण्यासाठी 'पूर्वज पूजा' निर्माण झाली. अशा प्रकारे प्राचीन संस्कृतीमध्ये जगाच्या वेगवेगळया भागांत विविध प्रकारच्या देवतांचा उदय झाला. त्यातूनच कोठे पिरॅमिड्स् बांधले गेले, तर कोठे मंदिरे बांधली गेली; कोठे यज्ञसंस्था अस्तित्वात आली.

प्राचीन भारतात आर्यांनी निसर्ग-देवतांचा पुरस्कार केला. या देवतांना हविर्भाग देण्यासाठी यज्ञसंस्था शोधून काढली. परंतु आर्य भारतात येण्याअगोदर भारतातमध्ये मातृपूजा, शिवपूजा, वृक्षपूजा आणि प्राणिपूजा अस्तित्वात होती हे सिंधू संस्कृतीमधील धार्मिक जीवनावरून स्पष्ट झाले आहे. तसेच भारताच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या अनार्य जमातींच्या वेगवेगळया देवता श्रध्दास्थानी होत्या. आपल्या राजकीय विस्ताराबरोबर आर्यांनी अनार्यांना आपल्या धर्मात समाविष्ट करण्यास सुरूवात केली. अनार्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांच्या देवदेतवतांना आपल्या धर्मामध्ये स्थान देणे आर्यांना सोयीस्कर वाटले. कालांतराने आर्यांची देवते हळूहळू मागे पडली आणि अनार्यांच्या अनेक देवतांनी वेगवेगळी रूपे धारण करून जनमानसात आपले स्थान दृढमूल केले. अनार्यांपैकी वन्य जमातींच्या किंवा अतिशूद्र जातींच्याही स्वतंत्र देवता होत्या. आर्य आणि अनार्य यांच्या मिलाफानंतर या क्षुद्र देवतांनीही ग्रामदेवता म्हणन मान मिळविला. यादवकालात काळिका, कोळाए, सुराए, डोबाए, जखीण यासारख्या कितीतरी क्षुद्र देवता प्रसिध्दीस आल्या होत्या. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात हा संक्रमणकाल धार्मिक एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानला पाहिजे.

मौर्य-सातवाहन काळात बौध्द धर्माच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या डोंगर-कपाऱ्यांतून - चैत्य आणि विहार कोरले जावू लागले. परंतु त्याचबरोबर महाराष्ट्रातील तत्कालीन नागरी आणि ग्रामीण जीवनात अनेक आर्य आणि अनार्य दैवतांनी मानाचे स्थान प्राप्त करून घेतले होते. गाथासप्तशतीमध्ये अग्नी, इंद्र, वरूण, कृष्ण, गणपती, प्रजापती, मदन, राम-लक्ष्मण, शिव, सूर्य या देवतांचा उल्लेख आढळतो. त्यापैकी गणपती, इंद्र आणि आर्य देवतांच्या प्रतिमांविषयीचे उल्लेख सप्तशतीमध्ये आहेत. नांगराची पूजाही सातवाहन कालामध्ये प्रचलित होती. बौध्दधमीयांच्या चैत्यमंदिरांच्या कल्पनेवरून गुप्त-वाकाटक काळात मंदिरे बांधली जावू लागली, असे एक मत नेहमी मांडले जाते; परंतु सप्तशीतीमधी 'अज्जाघरा' चा उल्लेख लक्षात घेतला तर देवतेचे मंदिर बांधण्याची कल्पना सातवाहनकालात प्रचलित होती, हे स्पष्ट होते. सप्तशतीमधील कमांक १७२ च्या गाथेमध्ये आर्या या देवतेच्या मंदिरात मेलेल्या रेडयाच्या गळयातील माळा टांगलेली असल्याचा उल्लेख आहे. तरी पण सातवाहनकाळातील देवतांच्या प्रतिमांची पूजा प्रामुख्याने घरगुती स्वरूपाची असावी असे वाटते.

वाकाटक काळातील मंदिरे अस्तित्वात नसल्यामुळे तत्कालीन देवतांविषयी स्पष्ट कल्पना येऊ शकत नाही. प्रवरपूर (विदर्भ) येथे सापडलेल्या रामाच्या मंदिराच्या अवशेषांवरून विष्णूच्या दहा अवतारांपैकी रामचंद्राला वाकाटकालात माहात्म्य प्राप्त झाले होते असे दिसून येते. कालिदासाच्या 'मेघदूता' मधीज रामगिरीचा आणि प्रभू रामचंद्राच्या पादुकांचा उल्लेख वरील अनुमानास पुष्टी देतो. बहुतेक वाकाटक राजे शैव असल्यामुळे वाकाटकांनी शिवाची मंदिरे बांधली असण्याची शक्यता आहे. वैदिक धर्माचे अभिमानी असलेल्या वाकाटकांनी बौध्द धर्मालाही राजाश्रय दिल्यामुळे अजिंठयाच्या पर्वतश्रेणीत बौध्द लेणी कोरली गेली व ती भित्तचित्रांनी सुशोभित झाली. महाराष्ट्रावर चालुक्यांची सत्ता असताना वैष्णव पंथाला पुरस्कार झाला असावा. मात्र चालुक्यकालीन मंदिरे महाराष्ट्रात आढळत नाहीत. बदामी (जि. विजापूर) येथील लेण्यांवरून वैष्णव पंथाला चालुक्यांनी राजमान्यता दिली होती, हे स्पष्ट होते. चाुक्यांचे गोत्र मानव्य असून त्यांची कुलदेवता 'वराह' ही होती. त्यांच्या सुवर्ण नाण्यांवर वराहाचे चिन्ह कोरलेले आढळते. राष्ट्रकूटांच्या काळात शैव, वैष्णव आणि जैन या पंथांना लोकप्रियता लाभलेली होती. वेरूळच्या 'कैलास' लेण्यामध्ये अनेक देवतांच्या मूर्ती पाहवयास मिळतात. शिव या देवतेची अनेक रूपे, सप्तमातृका, गजलक्ष्मी, गणपती, वराह, वामन, नरसिंह, कालिया मर्दन करणारा कृष्ण, वालीवध करणारा राम, मदन, रती, अन्नपूर्णा अशा विविध प्रकारच्या प्रतिमा वेरूळच्या लेण्यांतून पाहवयास मिळतात. त्यावरून राष्टकूट कालामध्ये महाराष्ट्रात शैव आणि वैष्णव पंथांची भरभराट झालेली दिसून येते. त्याचप्रमाणे भारतातील इतर प्रांतांप्रमाणे गुप्तोत्तर काळात महाराष्ट्रातही पौराणिक देवतांचा पुरस्कार केला जावू लागला, हे स्पष्ट होते.

महाराष्ट्र संस्कृतीचे खरे मानचित्र प्रामुख्याने यादव कालातच तयार झाले. महाराष्ट्राच्या प्रमुख कुलदेवतांचा उदय यादवकालातच झालेला आढळून येतो. 'स्थानपोथी' मध्ये आणि 'लीलाचरित्रा' मध्ये उल्लेखिलेल्या कितीतरी ग्रामदेवता आजही आपल्याला नित्य ओळखीच्या वाटतात. महाराष्ट्रात मंदिरे बांधण्याचे शास्त्र

यादवकाळात प्रगत झले. शिवाची अनेक लहानमोटी मंदिरे यादवकाळात बांधली गेली. पंढरपूरचे विठ्ठलमंदिर यादव काळातच उभारले गेले. राष्ट्रकूट-चालुक्य (कल्याणी) काळानंतर एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक बदल यादव काळात झालेला आढळून येतो, तो म्हणजे राष्ट्रकूटांनी पुरस्कार केलेल्या पौराणिक देवतांपेक्षा स्थानिक देवतांचे माहात्म्य यादवांनी वाढविले, आणि या देवता महाराष्ट्राच्या खास कुलदेवता बनल्या. पंढरपूरचा विठ्ठल, जेजुरीचा खंडोबा, कोल्हापूरची महालक्ष्मी, मातापूरची रेणुका, कोकणातील परशुराम आणि तुळजापूरची भवानी या देवतांचा या संदर्भात उल्लेख करावा लागेल.

इस्लामी राजवटीतही देवदेवतांचे प्रस्थ कमी झालेले मुळीच आढळून येत नाही; उलटपक्षी देवतांच्या संख्येत भरच पडलेली दिसून येते. नवससायास, कुलाचार, कुळधर्म, यांचा तर शाही राजवटीतही पुरस्कार झालेला आढळून येतो. खंडोबा, विठोबा, भवानी, महालक्ष्मी इत्यादी मुख्य देवतांप्रमाणे वीर, झोटिंग, वेताळ, रवंकाळ, मेसको, गारको, मैनाळ, मेसाबाई, जामाई, जोखाई वगैरे दैवते लोकांनी ठिककठकाणी स्थापून त्यांच्याकरिता बकरी-कोंबडी मारण्याचा प्रघात रूढ केला.

'शिवकाला' मध्येही यादवकालाप्रमाणेच अनेक देवतांची उपासना होत असावी. पंढरपूरचा विठ्ठल हे शिवकालातील सर्वसामान्य जनाचे लाडके दैवत. जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी या देवतांचे माहात्म्यही शिवकालात मोठया प्रमाणावर होते. भवानी ही तर शिवाजीमहाराजांचीच कुलस्वामिनी असल्यामुळे साऱ्या महाराष्ट्राचे श्रध्दास्थान बनले होते. औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, भीमाशंकर, परळी वैजनाथ, त्र्यंगबकेश्वर या जोतिर्लिंगांना जनमानसात मोठे स्थान होते. पंढरपूरच्या आषढी-कार्तिकी वारींना दिंडया-पताका घेवून हजारोंच्या संख्येने वारकरी आणि भाविक लोक जात होते. नाशिक, शिखर-शिंगणापूर, पाली इत्यादी क्षेत्रांनाही शिवकालात असाधारण महत्त्व प्राप्त झले होते. स्वराज्याच्या स्थापनेबरोबर इस्लामी राज्यकर्त्यांचा जुलूम कमी होवू लागला. त्यामुळे तीर्थयात्रा, नवससायास, व्रतवैकल्ये यांना उत्तेजन मिळून हिंदू धर्माला खऱ्या अर्थाने उरजाळा मिळाला.

शिवकालात पोराणिक देतवतांप्रमाणे ग्रामदेवतांचे माहात्म्यही पराकोटीस पोहोचलेले आढळून येते. गावोगाव वेगवेगळया प्रकारच्या ग्रामदेवतांची उपासना, चालू होती. जातीपरत्वे, प्रांतपरत्व या ग्रामदेवतांमध्ये भिन्नता आढळून येते. यमाई, तुकाई, नानाई, सटवाई, मरीआई, मायराणी, मेस्को, भैरव म्हसोबा, काळकाबई, मेसाई विणाई इत्यादी कित्येक ग्रामदेवतांची पूजा शिवकालात प्रचारात होती.

कामनापूर्तीसाठी देवतांना नवस केले जात. नवसाला पावणाऱ्या देवतांमध्ये खंडोबाचे स्थान सर्वश्रेष्ठ होते. कामनापूर्तीसाठी जेजुरीच्या खंडोबाला अनेक प्रकारचे नवस लोक करीत असत. जेजुरीच्या खंडोबाच्या संदर्भात ज्या नवससायासांचे वर्णन केलेले आहे ते सर्व प्रकारचे नवस शिवकालात रूढ असल्याचे दिसून येते. मुरळयांचे वर्तन मात्र नीतिबाहय असावे. तसे तत्कालीन वाड्.मयावरून स्पष्ट होते. नवससायसासांचा त्याचप्रमाणे सकाम भक्तीचा महाराष्ट्रातील साधुसंतांनी तिरस्कारच केला; परंतु  जनमानसावर अंधश्रध्दा, नवससायास, मंत्रतंत्र, दैवी चमत्कार यांचा प्रभाव कायम टिकून राहिला. तीच वृत्ती क्षुद्र देवताभाक्तीबाबतही आढळते. ज्ञानेश्वर-नामदेवांपासून बहुतेक संतांनी क्षुद्र देवताभक्तीचा निषेध केलेला दिसून येतो. 'योगसंग्रामा' चा कर्ता शेख महंमद क्षुद्र देवताभक्तीचा तिरस्कार करताना म्हणतो, "पाषाण झोंडी पाथरवट बैसोनि वर। त्यासी लाविती केल्या पैक्याच्या शेंदूर। पूजा करिती लहान थोर। भागवंता नेवता।" समर्थ रामदासस्वामींनीही क्षुद्र देवताभक्तीचा कडाडून निषेध केलेला आढळतो. "देव झाले उदंड। देवाचे मपांडिले भंड भूतादेवतांचे थोतांड। एकचि जाहले।" रामदास्वामींनीही भैरव, मल्हार, यक्षिणी, वेताळ, झोटिंग, काळी, कंकाळी, बाळा, बगुळा इत्यादी अनेक देवतांचा उल्लेख करून 'जितुके देव तितुके मंत्र' अशी टीका केली आहे. त्यावरून सामान्य लोकांमध्ये क्षुद्र देवतांची उपसना किती मान्यता पावलेली होती, हे दिसून येईल. साधुसंतांनी क्षुद्र देवताभक्तीचा कडाडून निषेध जरी केलेला असला तरी जनमानसातील क्षुद्र देवतांचे स्थान तसूभरही कमी झाले नाही. प्रा. गं.बा. सरदार यांनी म्हटल्याप्रमाणे, 'ज्ञानेश्वर-नामदेवांपासून सर्व संतांनी क्षुद्र देवताभक्तीचा वारंवार निषेध केला असताही ही प्रवृत्ती अगदी चिवटपणे शतकानुशतके टिकून राहिली होती. रामदासस्वामींनी "नर्मदा मंडकी तीरी। देव पडिले लक्षवरी।" अशी अनेक देवतावादावर टीका करून शेवटी "अधिकारे नाना देवते। भजत जावी।" असाच संदेश सामान्यजनांना दिलेला आढळतो; त्याचे कारण असे की ग्रामदेवतांवरील श्रध्दा  सर्वसाधारण्या लोकांत अतिशय खोलवर रूजलेली होती. गुप्तकाळात कुळदूवतांचा उदाय झाला; परंतु हजारो वर्षांच्या परंपरेने चालत आलेल्या ग्रामदेवतांचे स्थान अढळच राहिले. धर्मजागृतीसाठी रामदासस्वामींसारख्या संतांना 'शेंदऱ्या देवतांचे' माहात्म्य अखेरीस मान्य करावे लागले.' या ग्रामदेवतांच्या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे शतकानुशकके विशिष्ट ग्रामदेवता ग्रामीण जीवनाशी संबंधित असून आपल्या गावाचे रक्षण, पर्यायाने गावातील रहिवाशी यांचे रक्षण ही ग्रामदेवता करत असते, आणि म्हणून तिची आराधना श्रध्दायुक्त अंत:करणाने केली पाहिजे; असा विश्वास जनमानसात पिढयान्पिढया खोलवर रूजून बसलेला आढळतो. या ग्रामदेवतांचा अभ्यास हा एक स्वतंत्र विषय असून या विषयाचा सर्वांग परिपूर्ण अभ्यास झाल्यास मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर फार मोठा प्रकाश पडू शकेल. ग्रामदेवतांमध्ये प्रामुख्याने भैरव, मल्हारी मार्तंड, मारूती, वेताळ, म्हसोबा, गणपती, नरसोबा अशा पुरूष देवतांचा समावेश असून यल्लमा, रेणुका, एकविरा, तुकाई, यमाई, जगदंबा, मरीआई, सटवाई इत्यादी स्त्रीदेवतांचा समावेश होतो. या बहुतेक देवता ग्रामरक्षक मानल्या जातात. प्राचीन काळी गावाचे रक्षण यक्ष करीत असत अशी समजूत होती. हे यक्ष आकाराने थोडे फार विक्षिप्त आणि रूपाने चित्रविचित्र असे असत. बौध्द धर्माच्या विशेषत: महायान पंथांच्या प्रभावाखाली महाराष्ट्र असतांना अनेक यक्षांची स्थापना ग्रामरक्षक म्हणून झालेली दिसते. या यक्षांचेच रूपांतर नवव्या दहाव्या शतकात विविध प्रकारच्या ग्रामदेवतांमध्ये झाले असावे असे मत आहे.

जांभाल कुबेराचे रूपांतर गणपतीमध्ये झाल्याची अनेक उदाहरणे सांगता येणे शक्य आहे. सुप्रसिध्द पुरातत्त्व शास्त्रज्ञ म.न. देशपांडे यांनी "टाणाला" येथील बौध्द लेण्यांवर व्याख्यान देताना मूळ यक्ष मूर्तीचे गणपतीच्या मूर्तीत रूपांतर झाल्याची अनेक उदाहरणे दिली आहेत. महाड येथील गणपती 'कोंडाणे अंबिवली' या लेण्याच्या परिसरात स्थापन केला गेला. देशपांडे यांच्या मताप्रमाणे प्राचीन घाटांच्यारस्त्यांवर संरक्षक यक्षांची पूजा होत असावी, आणि बौध्द धर्माच्या पडत्या काळात येथे गणपती क्षेत्र स्थापन झाले असावे. वेरूळच्या दशावतार लेण्यांत वरच्या मजल्यावर काही बौध्द प्रतिमा बदलून हिंदू देवतांचे रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात यक्षाचा गणेश केल्याचा दिसतो, आणि महामायोदीला कार्तिकाचे रूप देण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. गणपतीप्रमाणेच मारूती, खंडोबर, भेरव इत्यादी ग्रामदेवता महाराष्ट्रामध्ये मध्ययुगात ठळकपणे लोकप्रिय झाल्या आहेत. या ग्रामदेवतांचे माहात्म्य सहयाद्रीच्या रांगांमध्ये व कोकण परिसरामध्ये वेगवेगळया प्रकारे वाढलेले आढळून येते. या ग्रामदेवता म्हणजे शक्तिदेवता या दृष्टीने त्यांची उपासना दृढ झाली. परंतु असे असले तरी पूर्वभारतामध्ये प्रगत झालेल्या शाक्त पंथाचा महाराष्ट्रामध्ये मोठा प्रभाव पडला नाही. तरीपण शाक्त पंथाची परंपरा अपरांत म्हणजे कोकण भागात निर्माण झाली असावी असे काही पुरातत्त्वीय पुराव्याच्या आधारे स्पष्ट करता येण्यासारखे आहे. म.न. देशपांडे यांनी 'पन्हाळे काजी' येथील बौध्द लेण्यांतील शिल्पपटांचे विश्लेषण करीत असताना तंत्रमार्गाचा अपरांतामध्ये कशाप्रकारे शिरकाव झ ाला हे स्पष्ट केले आहे. पन्हाळे काजी या ठिकाणी तांत्रिक व्रजयान केंद्र होते असे म.न. देशपांडे यांनी स्पष्ट केले आहे. येथील लेण्यांमध्ये महाचंडरोषण या तांत्रिक देवतेची प्रतिमा असून या मूर्तीची पूजा नेपाभ्ळमध्ये आणि तिबेटमध्ये मध्ययुगात होत असे. मूर्ती फार अक्राळविक्राळ असून तिची आराधना अघोरी स्वरूपाची आहे. याशिवाय 'अक्षोभ्य मूर्ती' 'अवलोकितेश्वर', 'मंजुश्री' व 'प्रज्ञा पारमीता' इत्यादी वज्रयान तंत्रातील मूर्तीची माहिती देशपांडे यांनी दिलेली आहे.

तंत्रमार्गाचा नाथपंथावर कसा प्रभाव पडला होता त्याचे विवेचन पन्हाळी काजी येथील चौदाव्या क्रमांकाच्या लेण्याच्या आधारी देशपांडे यांनी केलेले आहे. या लेण्यातील नाथ संप्रदायाची शिल्पे चौदाव्या शतकातील असून देशपांडे यांनी असे स्पष्ट केले आहे की वज्रयान पंथाची जागा मध्ययुगात कोकणात नाथसंप्रदायाने घेतली. देशपांडे यांच्या मताप्रमाणे कोकणातील नाथपरंपरा उत्तरकालातही चालू होती. रत्नागिरी जिल्हयातील श्रृंगारपूर येथील एक शिवयोगी बंगालमधील राढा येथील

सिध्दापाशी गेला व त्याची दीर्घकाळापर्यंत सेवा करून स्वतः सिध्द झाला. आणि आपल्या गावी परत येवून त्याने आपली मठी स्थापन केली. या शिवयोग्याचे मराठा राजा छत्रपती संभाजी यांच्याशी संबंध आले होते.

या सुमारास तंत्रमार्गात निपुण असा कविकलश छत्रपती संभाजीचा प्रमुख सल्लागार बनला. थोडक्यात असे दिसूमन येते की मध्ययुगामध्ये विविध प्रकारच्या पंथांचा महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया काळखंडात कमी-जास्त प्रभाव पडत होता. आणि त्याचा परिणाम समाज-जीवनावर निश्चितपणे होत होता. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील ग्रामदेवतांचा, विविध पंथांचा, सांस्कृतिक परंपरेचा अभ्यास, मध्ययुगीन पुरातत्त्वीय आणि पुराभिलेखीय साधनांच्या आधारे होणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

(१) पगडी सेतू माधव - मराठे व औरंगजेब - ज्ञानराज प्रकाशन पूणे
(२) बेंन्द्रे वा.सि. - महाराष्ट्र इतिहासाची साधने खंड ३ - मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई
(३) राजवाडे वि.का. - मराठयांच्या इतिहासाची साधने खंड १० - महाराष्ट्र साहित्य परिषद पूणे, १९०९
(४) कूळकर्णी अ.रा., खरे ग.ह. (संपा.) - मराठयांचा इतिहास खंड २ - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथ निर्मिती मंडळ नागपूर, इ.स. १९८६
(५) कठारे डॉ. अनिल व कदम डॉ. वसंत - मराठे कालीन समाज, गुन्हे, दंड आणि शिक्षा - उषा वाघ सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, पूणे प्रथमावृत्ती, इ.स. २००९
(६) पवार जयसिंगराव - मराठी सत्तेचा उदय - जमानदास आणि कंपनी व्दितिय आवृत्ती, इ.स. १९८८
(७) देशपांडे डॉ. प्र.न. - नूतन सृष्टीचा जनक श्रीशिव छत्रपती - स्नेहवर्धन प्रकाशन पूणे इ.स. २६ जाने २००८
(८) बैसाने अनिल, पाटिल सुभाष - मराठे कालीन समाज आणि अंधश्रध्दा - डि.एम. बंडाळे कल्पना प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती, इ.स. २००५
(९) सरदइसाई गो.स. - मराठों का नविन इतिहास खंड २ - शिवलाल अग्रवाल एन्ड कंपनी आग्रा, तृ.आ. १ जाने १९७२